(अर्ज स्विकारणेचा कालावधी - 12/05/21 to 17/05/2021)

राष्ट्रीय आरोग्य अभियान, सिंधुदुर्ग

जा.क्र.सिंजिप/आवि/ 2709/2021
जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग

दिनांक 12 /05 /2021

राष्ट्रीय आरोग्य अभियान, सिंधुदुर्ग

सार्वजनिक आरोग्य विभाग, सिंधुदुर्ग अधिनिस्त खालील नमुद करणेत आलेली मनुष्यबळ भरती कोवीड - 19 उपचारासाठी जिल्हयात कोरोनाचा कोवीड - 19 वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकची आरोग्य सेवा देण्याकरिता DCH, DCHC, CCC येथे कोवीड - 19 साथीचा संसर्गजन्य आजार नियंत्रणात येईपर्यंत खालील प्रस्तावित पदांना तीन महिने या कालावधीसाठी नेमणूक देणेत येईल. तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार पुढील तीन महिने करिता मुदतवाढ देणेत येईल. आवश्यकतेनुसार कंत्राटी पद्धतीने मानधन तत्वावर भरणेसाठी प्रतिक्षा यादी करणेकरिता अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | मुळ संवर्ग | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन |
|---|---|---|---|
| 1 | स्टाफ नर्स | **GNM/ BSC Nursing (Maharashtra Nursing Council Registration)** | रु. 20000/- |

<u>अटी व शर्ती खालीलप्रमाणे-</u>

१) **मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे नियमितपणे प्राप्त होणा-या भरतीबाबतचे मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणेत येईल याची पात्र उमेद्वारांनी नोंद घ्यावी.**

२) सदर सेवा निव्वळ कोवीड - 19 उपचारासाठी तसेच जिल्हयातील उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे आरोग्य सेवा देणा-या अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता लक्षात घेऊन ठराविक कालावधीसाठी आहेत. भरावयाची पदे राज्य शासनाची नियमित पदे नाहीत. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनाकडे सेवा संरक्षणासाठी दावा करणेचे कोणतेही अधिकार नियुक्त उमेद्वारास राहणार नाहीत. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना राहील.

३) सार्वजनिक आरोग्य विभागातुन संवानिवृत्त कर्मचारी विहित वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हतेचा निकष पुर्ण करीत असतील तर अर्ज करु शकतील.

४) जीएमएम/ बीएससी (नर्सिंग) उमेद्वार आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध झाले नाहीत तरच ANM (आरोग्य सेविका) उमेद्वारांचा विचार करणेत येईल. याची एएनएम उमेद्वारांनी नोंद घेणेची आहे. (आरोग्य सेविकांसाठी एएनएम शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण व एमएनसी कौन्सिलची मान्यता आवश्यक राहील. या पदासाठी मानधन रु. 18000/- (अक्षरी रु. अठरा हजार मात्र) राहिल.

५) <u>फिजिशिअन, वैदयकिय अधिकारी-एमबीबीएस, आयुष वैदयकिय अधिकारी, व स्टाफ नर्स</u> या पदासाठी शैक्षणिक अर्हता पुर्ण करणा-या इच्छुक उमेद्वारांनी **आपले अर्ज व विहित शैक्षणिक अर्हताधारक प्रमाणपत्रके एकत्र स्कॅन करुन <u>एकच</u> पीडीएफ फाईल करुन <u>covidhrsindhudurg@gmail.com</u> या ई- मेल आयडीवर पाठविणेची आहेत.**

६) **यापुढे कोवीडची साथ आटोक्यात येईपर्यंत दर महिन्याच्या 15 व 16 तारीखला उपरोक्त पदांचे अर्ज सुचित केलेनुसार दिलेल्या ई मेल आयडीवर स्विकारणेत येतील. पात्र उमेद्वारांनी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वेबसाईटचे नियमितपणे अवलोकन करावे.**

७) **उमेद्वाराने नोंदणीकृत केलेला ई मेल आयडी, मोबाईल नंबर व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वेबसाईटचे नियमितपणे अवलोकन करावे. उमेद्वारांचे नियुक्ती आदेश त्यांनी नोंदणीकृत केलेल्या ई मेल आयडीवर अगर वॉट्स ॲपवर पाठविणेत येतील याची उमेद्वारांनी नोंद घ्यावी.**

८) **पदभरतीची विस्तृत जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषद, सिंधुदुर्गचे संकेतस्थळावर**

**www.zpsindhudurg.maharashtra.gov.in प्रसिद्ध करणेत येणार आहे. याबाबत अर्जदारास स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. आपले अर्ज व विहित शैक्षणिक अर्हताधारक प्रमाणपत्रके एकत्र स्कॅन करुन <u>एकच</u> पीडीएफ फाईल करुन पदनिहाय वर नमुद करणेत आलेल्या ई मेल आयडीवर दिनांक 12 / 0 5 /2021 ते 17 /0 5 /2021 या कालावधीपर्यंत पाठविणेची आहेत. विहित कालावधी संपृष्टात आलेनंतर अर्जाचा विचार करता येणार नाही. तसेच दिलेल्या ई मेल आयडी व्यतिरिक्त अन्य ईमेल आयडीवर अर्ज सादर केला असेल तर तो ग्राहय धरणार नाही. विहित ई- मेल आयडीवर एका उमेद्वाराने एकच अर्ज एकापेक्षा जास्त वेळा सादर केलेला असेल तर प्रथम पाठविलेल्या अर्जाचा विचार करणेत येईल याची पात्र उमेद्वारांनी नोंद घ्यावी. निवड झालेल्या उमेद्वारांची प्रतिक्षा यादी करणेत येऊन आवश्यकतेप्रमाणे नियुक्ती आदेश देणेत येतील.**

९) **निवड झालेल्या उमेद्वारांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचा-यांप्रमाणे राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त झालेल्या अटी व शर्थी रु. 100/- चे बॉन्डपेपरवर लिहून करारनामा सादर करणे बंधनकारक आहे.**

१०) **<u>वयोमर्यादा</u>- स्टाफ नर्स, या पदांची भरतीसाठी कमाल वयोमर्यादा 59 वर्षे व सेवा समाप्तीची मर्यादा 65 वर्षे राहिल. 60 वर्षावरील अर्जदारांकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरिक योग्यतेचे प्रमाणपत्रक (मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट) सादर करणे अनिवार्य राहिल.**

११) **<u>विहित सांक्षांकित प्रमाणपत्राबाबत</u>- पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या उत्तीर्ण वर्षाची मार्कलिस्ट, उच्च शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या उत्तीर्ण वर्षाची मार्कलिस्ट याचे साक्षांकित प्रती, वयाचे सबळ पुराव्यासाठी शाळा सोडलेचा दाखला किंवा आधारकार्ड, शासकीय अगर निमशासकीय कामाचे अनुभव प्रमाणपत्र, या विहित प्रमाणपत्रांव्यतिरिक्त अन्य कोणतेही प्रमाणपत्र सादर करणेत येऊ नये. याची उमेद्वारांनी नोंद घ्यावयाची आहे. सर्व प्रती साक्षांकित असणे आवश्यक**